आर.सी.सी. ४५२/२०२३
शासन वि. किरण व इतर
नि.क्र.६०

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.२ चा शपथेवर जबाब
माझे नांव — सुनिताबाई साईनाथ धनेधर,
माझे वय – ५० वर्ष , धंदा : घरकाम
राहणार – हनुमान घाट, खांडसरी, ता. जि. जालना.

**<u>सरतपासणी सहाय्यक सरकारी वकील श्रीमती जे. डी. राठोड यांच्यामार्फत सूरू</u>**

०१. फिर्यादी माझी मुलगी आहे. आरोपी क्र.१ तिचे पती असुन इतर आरोपी आरोपी क्र.१ चे नातेवाईक आहेत. आरोपी क्र.१ याच्यासोबत माझ्या मुलीचे लग्न सन २०१५ मध्ये जालना येथे झाले होते. लग्नानंतर ती सासरी गारखेड, ता. देऊळगांवमही, जि. बुलढाणा येथे नांदायला गेली. त्यावेळी फिर्यादी व सर्व आरोपी सोबत रहात होते. आरोपींनी तिला एक वर्षे चांगले नांदविले. त्यादरम्यान तिला मुलगी झाली. आरोपींना मुलगा पाहिजे होता परंतु फिर्यादीला मुलगी झाली त्याकारणाने आरोपी तिला शिवीगाळ करुन भांडण करु लागले. तिचे दिर म्हणायचे की, तु आमचे कपडे धुत नाहीस असे म्हणुन शिवीगाळ करत होते. आरोपी क्र.१ तिला म्हणायचा की, छोटा हत्ती घेण्यासाठी माहेराहुन एक लाख रुपये घेऊन ये. त्याप्रमाणे मी आरोपी क्र.१ यास रुपये तीस हजार दिले. एक लाख रुपये दिले नाही म्हणुन आरोपी क्र.१ फिर्यादीला चापटाने मारहाण करु लागला व आरोपी क्र.२ व ३ तिला त्रास दयायचे. सदर त्रासाबाबत फिर्यादीने मला सांगितले असता मी आरोपींना समजावुन सांगितले. त्यानंतर फिर्यादीच्या गळयाला गाठी आल्या होत्या. आरोपी म्हणाले की, उपचार करण्याकरीता आमच्याकडे पैसे नाहीत तु माहेरी जा, माहेरी नाही गेली तर जिवे मारुन टाकु अशी धमकी दिली. आरोपींच्या त्रासाला कंटाळुन फिर्यादी सन २०२२ मध्ये माहेरी निघुन आली. त्यानंतर तक्रार दाखल केली. आज रोजी आरोपी क्र.१ न्यायालयात हजर आहे. इतर आरोपी हजर नाहीत.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपी क्र.१ तर्फे विधिज्ञ श्री. एस. बी. मोरे यांच्यामार्फत–</u>**

०२. आरोपीने पैशाची मागणी कधी केली त्याची तारीख सांगता येणार नाही. मी आरोपीला रुपये तीस हजार दिले हे दाखविण्याकरीता कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की, छोटा हत्ती घेण्याकरीता आरोपीने पैशाची मागणी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ कडे गाडी चालविण्याचा परवाना नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी फिर्यादीला कधीही पैशांची मागणी करुन त्रास दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीला आरोपींसोबत रहायचे नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी स्वतःच्या मर्जीने माहेरी रहात आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी माझी मुलगी असल्याने तिला मदत करण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपी क्र.२ ते ५ तर्फे विधिज्ञ श्री. एस. ए. साळवे यांच्यामार्फत –</u>**

वरील उलटतपास मान्य करण्यात आला.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरीत/–
(सि. म. पाडोळीकर)
मुख्य न्यायदंडाधिकारी, जालना.

दि. १३.०८.२०२६.